वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# भावी नगराध्यक्ष, नगरसेवकांकडून भौतिक सुविधांचा विकास, समाजसेवेची बीडकरांना अपेक्षा

## मूलभूत सुविधा अन् विकासात्मक बाबींना मिळावे प्राधान्य

बीड । बीड जिल्ह्यातील मोठी तसेच महत्त्वाची म्हणून बीड नगर परिषद ओळखली जाते. अनेक दिग्गज नेत्यांनी या नगर परिषदेवर राजकीय वर्चस्व गाजवले आहे. सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशा स्थितीत मतदारांच्या अपेक्षा दिव्य वार्ताने जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यात सर्वसमावेशक विकास व्हावा, सर्व गोष्टींवर भर देत समाजकारण, राजकारण करावे, जागरूक बीडकरांची अपेक्षा आहे.

### खुर्ची नव्हे विकास व्हावा



नगराध्यक्ष असा असावा की, जेव्हा तो पदावरून दूर जाईल, तेव्हा लोकांना त्याचे 'काम' आठवेल, त्याचे 'पद' नव्हे. त्याने खुर्चीचा मान ठेवावा, खुर्चीने त्याचा नाही!' ऐतिहासिक शहराचा वारसा जोपासत विकासात भर घालावी

**समीर सरकार** (पत्रकार)

### मूलभूत गरजा पुरविणारे हवे



शहरासाठी रस्ते, पाणी आणि वीज हे महत्त्वाचे प्रश्न आहेत ते भावी नगराध्यक्षांनी सोडवण्याची गरज आहे. स्वच्छ प्रतिमा बरोबर बोगसपणा करणारा नसावा याचबरोबर हेवेदावे त्याच्या कार्यकाळात होऊ नयेत.

**शेख रेहान** (नागरीक)

### तरुणांसाठी प्रेरणादायी असावे



सामान्य नागरिकांना सुविधा देण्याबरोबरच तरुणांसाठी प्रेरणादायी असा नगराध्यक्ष असावा. नवे व्हिजन घेऊन पुढे जाणारा, जाती-धर्माच्या जखड्यात न अडकणारा नेता हवा. तसेच नगरसेवक सुध्दा असेच असावेत.

**शेख सादेक** (नागरीक)

### शहर विकासाचे निर्णय घ्यावे



नगराध्यक्षाकडे नेतृत्वगुण, कौशल्ये आणि निर्णयक्षमता अत्यंत आवश्यक आहे, कारण ह्याच गुणांमुळे शहराच्या हिताचे निर्णय जलद आणि योग्य पद्धतीने घेऊ शकतो. किल्ले धारूरच्या सर्वांगीण विकासासाठी असा सक्षम, दूरदृष्टीचे नेतृत्व हवे.

**शेख युनूस** (नागरीक)

## अमरसिंह पंडितांनी आणला तकडा उमेदवार,बीडमध्ये होणार पचरंगी लढत

# पप्पू कागदेंच्या मनगटात घड्याळचे चिन्ह

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



## दोन्ही राष्ट्रवादी, काँग्रेस, एमआयएम अन् योगेश-भाजप आघाडी

### उद्या दुपारपर्यंत नगराध्यक्षांसह नगरसेवक पदाचे उमेदवार जाहिर होणार

बीड, (दिव्य न्युज):- बीडमध्ये शुक्रवारी मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादीचा दरवाजा स्वतःसाठी बंद केला आहे. त्यांनी आता मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासोबत हातमिळवणी केली असून पुढच्या दोन दिवसात त्याबाबतची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. 'नगरसेवक तुम्ही निवडा, मात्र नगराध्यक्ष माझा असेल' असा स्पष्ट निर्णय मंत्री पंकजाताई मुंडे यांनी क्षीरसागर यांना दिला आहे. तो निर्णय मान्य करायचा की नाही याचा चेंडू आता योगेश क्षीरसागर यांच्या कोर्टात आहे. त्यांनी बीड विकास आघाडी या नावानं रजिस्ट्रेशन देखील केलेलं होतं. दुसरीकडे बीड शहराची


▶▶ पान २ वर

### आज उशीरा किंवा उद्या सकाळी रिपाइंचे नेते रामदास आठवलेंच्या निर्णयानंतर पप्पू कागदेंचा निर्णय होणार जाहिर

### आ.संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून शेख मुजीब, सचिन सोनवणे, विष्णू वाघमारेंमध्ये रस्सीखेच

# डॉ.योगेश क्षीरसागरांनी दिला अध्यक्षपदाचा राजीनामा

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बीड विधानसभेचा राजीनामा तटकरेंकडे सुपूर्द



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिका निवडणुकीच्या उमेदवारी वाटपावरून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये झालेल्या घमासानामुळे आज राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना पाठविलेल्या राजीनामापत्रात म्हंटले आहे की, मी बीड विधानसभा अध्यक्षपदी काम करत होतो, वेळोवेळी स्थानिक

▶▶ पान २ वर

# आ.क्षीरसागरांकडून नगराध्यक्ष पदासाठी सचिन सोनवणेंचे नाव

### सर्व समाजाकडून सचिन आप्पांच्या उमेदवारीची जोरदार मागणी



बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिकेची रणधुमाळी सुरु झाली असून बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचे अनेक इच्छुक उमेदवारांचे नावे समोर येत आहेत. सर्व पक्षाकडून इच्छुक नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) कडून देखील मुलाखती घेण्यात आल्या असून आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून सचिन आप्पा सोनवणे यांचे नगराध्यक्ष पदासाठी नाव जाहीर होऊ शकते.

आ.संदीप क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी भवन येथे सर्व समाजातील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांचे मते जाणून घेतली होती. त्यावेळी विशिष्ट समाजाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्याची मागणी होत असल्याने आ.संदीप क्षीरसागर

▶▶ पान २ वर

# गटातटाच्या राजकारणा भोवती बीड नगरपालिकेची निवडणूक

### ८ वर्षांपूर्वी भाऊ-विरूध्द भाऊ उभा राहिल्याने एमआयएमने मारली होती मुसंडी

बीड, (दिव्य न्युज):- आठ वर्षापूर्वी बीड पालिकेची निवडणूक क्षीरसागर बंधू विरुध्द बंधू अशी होती. मात्र एमआयएमने दाखवलेल्या ताकदीमुळे शेख निजाम यांचा निसटता पराभव होऊन राष्ट्रवादीच्या भारतभूषण क्षीरसागर यांचा १७०० मतांनी विजय झाला. इतिहासात प्रथमच अनुसुचीत जाती महिला उमेदवारांसाठी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सुटल्याने मताचे समिकरण जुळवण्यासाठी कोणता उमेदवार प्रभावी राहणार यासाठी बीडमध्ये प्रभावी असलेल्या क्षीरसागर बंधूंमध्ये



खलबते सुरू आहेत. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी दोन दिवस शिल्लक असताना बीडमध्ये एकाही पक्षाचा नगराध्यक्षपदासाठी उमेदवार जाहिर झाला नाही. कारण मुलभूत प्रश्नांपेक्षा जातीपातीचे समिकरण जुळवण्यावरच

▶▶ पान २ वर

# नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकीच्या नामनिर्देशनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत बदल

### राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

मुंबई, ( दिव्य न्युज):- नगरपरिषदा-नगरपंचायतींच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरणाऱ्या उमेदवारांसाठी एक महत्वाची बातमी आहे. राज्य निवडणूक आयोगाने आता नामनिर्देशनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत मोठा बदल केला आहे. त्यानुसार उमेदवारांना आता ऑफलाईन पद्धतीनेही नामनिर्देशपत्र भरता येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवरांच्या मागमीनंतर आयोगाने हा निर्णय घेतला आहे. इतकच नाही, तर आता शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही उमेदवारांना अर्ज भरता येणार असल्याचं निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आलं आहे.

राज्यातील सध्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदासाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रियाही सुरु करण्यात आली आहे. त्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने ऑनलाईन पद्धतीने नामनिर्देशपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु यात तांत्रिक अडचण येत असल्याने विविध राजकीय पक्ष आणि इच्छूक उमेदवारांकडून ऑफलाईन पद्धतीने नामनिर्देशनपत्रे घेण्याची मागणी करण्यात आली.

उमेदवारांच्या मागणीनंतर राज्य निवडणूक आयोगाकडून क्षेत्रीय स्तरावर आढावा घेण्यात आला. त्यानंतर ऑफलाईन पद्धतीनेसुद्धा

▶▶ पान २ वर

सुलेमान देवळा ग्रा.पं. कार्यालयात मध्यरात्री धुमाकूळ

# कुऱ्हाड घेऊन तोडफोड, कागदपत्रांची जाळपोळ

कडा, (दिव्य न्युज):- आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे शुक्रवारी (दि. १४) रात्री ग्रामपंचायत कार्यालयात धक्कादायक तोडफोडीची घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या एका अज्ञात व्यक्तीने हातात कुऱ्हाड घेऊन ग्रामपंचायतीचे कुलूप फोडत आत शिरून महत्त्वाचे दस्तऐवज पेटवून दिल्याचा प्रकार उघडकीस आला. या आगीत ४० ते ५० रजिस्टर तसेच अनेक महत्वाच्या फाईल्स जळून पूर्णतः नष्ट झाल्या आहेत.

गावकऱ्यांच्या माहितीनुसार, आरोपीने मध्यरात्रीच्या सुमारास कार्यालयाचे दार तोडून आत प्रवेश केला. कागदपत्रे अस्ताव्यस्त फेकून देत काही दस्तऐवजांना आग लावण्यात आली. धूर व जळालेल्या कागदांचा ढिगारा पाहून सकाळी गावकऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी त्र्यंबक मुळीक यांना माहिती दिली.

घटनास्थळी नुकसानीचा पंचनामा

घटनेनंतर ग्रामविकास अधिकारी त्र्यंबक मुळीक, सरपंच दादा यदु घोडके, अतुल पोपट घोडके, भिमराव भादवे, सचिन खोरदे, नवनाथ व एकनाथ भोजे यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. मुळीक यांनी सांगितले की, घटनेबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.ही घटना कोणामुळे व कोणत्या हेतूने घडवून आणली याबाबत पोलीस तपास सुरू आहे. या आगीनंतर ग्रामपंचायतीतील अनेक संवेदनशील कागदपत्रांचे नुकसान झाल्याने गावात भीतीचे सावट पसरले आहे.

# लंपीच्या प्रादुर्भावाने बीड जिल्ह्यातील पशुपालकांचे संसार उध्वस्त

बीड,(दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून शेतकरी आणि पशुपालकांची चिंता दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. जिल्ह्यात तब्बल ९०० जनावरे बाधित झाली असून यापैकी ५८ जनावरांचा मृत्यू झाल्याने पशुपालकांचे संसार अक्षरशः उद्धस्त झाले आहेत. वाढता मृत्युंजाळ, घटलेले दूध उत्पादन आणि जनावरांच्या उपचारांचा वाढता खर्च या तिहेरी संकटामुळे शेती व पशुपालन धोक्यात आलेले असताना, खा. बजरंग सोनवणे यांनी मात्र या गंभीर परिस्थितीकडे वेळेत लक्ष वेधत मुख्यमंत्र्यांकडे ठोस मागण्यांचे पत्र देऊन शेतकरी पुत्राचा जागरूकपणा दाखवून दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात खा. सोनवणेंनी जिल्ह्यातील परिस्थितीचे सविस्तर चित्रण केले आहे. यात जिल्ह्यामध्ये ९०० बाधित जनावरे, ५८ मृत्यू, ६३४ बरी झालेली जनावरे, ३,४१,१३५ जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले असून पशु संवर्धन विभागाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष केल असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान बीड जिल्ह्यात दूध उत्पादनात मोठी घट, तसेच काही भागांत दुधाचे सेवन टाळण्याच्या सूचना दिल्याने दुग्धव्यवसायिकांवरही आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. खा. सोनवणे यांनी प्रमुख मागण्या केल्या असून यात बाधित भागांत पशुवैद्यकीय पथकांची संख्या वाढवावी, लसीकरण पूर्ण करण्यासाठी मोहिमेला गती द्यावी, मृत जनावरांच्या मालकांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी, दुग्धसंघ आणि डेअरी केंद्रांसाठी तात्पुरती मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, जिल्हा प्रशासनाला आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा अशा आहेत आपल्या हस्तक्षेपामुळे परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी मुख्यमंत्र्यांना व्यक्त केला आहे.लंपीमुळे शेतकरी अक्षरशः होरपळत आहेत. जनावरांचा जीव जातोय, दूध उत्पादन घटतंय आणि खर्च मात्र वाढतोय, अशा वेळी सरकारने तातडीने मदत न देणं म्हणजे अन्यायच. बीड जिल्ह्यातील प्रत्येक पशुपालकाच्या पाठीशी ठामपणे उभं राहणं ही आपली जबाबदारी आहे. त्वरित नुकसानभरपाई, १००% लसीकरण आणि उपचार पथके वाढवणे हा विलंब न करता घेतला जाणारा निर्णय असायला हवा असे खा. बजरंग सोनवणे यांनी सांगितले.बीड तालुक्यातील एका पशुपालकाने आपल्या वेदना व्यक्त करताना सांगितले लंपीने माझी दोन जनावरे गेली. आणखी चार आजारी आहेत. दररोज औषधांचा, डॉक्टरांचा खर्च वाढतोय. घर चालवायला पैसे उरत नाहीत. सरकारनं आमच्याकडे बघितलं नाही तर आम्ही जगायचं कसं?

# प्रभाग क्रं. २५ मधून ज्योती संतोष घोडके आघाडीवर

## जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद, विजय निश्चितच



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद प्रभाग क्रमांक २५ मधुन सर्वसाधारण महिला मधुन सौ.ज्योती संतोष घोडके हेच नाव प्रभागात आघाडीवर आहे. ज्योती संतोष घोडके यांचे पती संतोष (बाळासाहेब) घोडके यांचा प्रभागातील शिवाजीनगर, स्वराज्य नगर, गणपती नगर, धांडे नगर, सोमेश्वर नगर तसेच जुना धानोरा रोड ह्या भागात चांगला जनसंपर्क असुन गेले अनेक वर्षांपासून या भागातील स्थानिक पातळीवर समस्यां सोडविण्याबाबत पुढाकार घेऊन त्या सोडलेल्या आहेत तसेच लाईट, रस्ते, नाल्या करण्या साठी प्रयत्न करून बर्याच प्रमाणात मार्गी लागलेल्या आहेत त्याच बरोबर सामाजिक व राजकीय कार्यक्रमात अग्रेसर असतात. म्हणून स्थानिक पातळीवरील समस्यांची जाणीव असलेले व सर्व प्रभागात सुपरिचित असलेले नेतृत्व संतोष (बाळासाहेब) घोडके यांनी त्यांची पत्नी जोती संतोष घोडके यांना बीड नगरपरिषद प्रभाग क्रमांक २५ सर्वसाधारण महिला मधुन निवडणूकीत उभा करणार आहेत. तरी त्यांना स्थानिक जनता भरपुर मताधिक्याने निवडून देतील.

# तोंडावर बुक्की मारून वृद्धाचे दात पाडले ; मुलगा, सुनेस ही मारहाण

केज (दिव्य न्युज):- शेतातील गवत काढत असलेल्या एका ७५ वर्षीय वृद्धाच्या तोंडावर बुक्की मारून दोन दात पाडले. तर मुलगा व सुनेस लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना डोका (ता. केज) येथे घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

डोका येथील बंकट माधव चौरे (वय ७५) हे १२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता शेतात गवत काढीत असताना विश्वनाथ चौरे, प्रमोद चौरे, उषाबाई चौरे, अंजली चौरे हे चौघे आले. त्यांनी जमीन आमची असून तुम्ही गवत काढू नका म्हणाले. त्यावर कोर्टातून वाटणी झाल्याचे म्हणताच विश्वनाथ व प्रमोद या दोघांनी बंकट चौरे यांच्या तोंडावर बुक्या मारून त्यांचे दोन दात पाडले. लाथाबुक्याने मारहाण केली. तर त्यांची सून आशाबाई हिस उषाबाई व अंजली या दोघींनी केसाला धरून खाली पाडून लाथाबुक्याने व चापटाने मारहाण केली. तर त्यांचा मुलगा मधुकर हा भांडण सोडविण्यास आला असता त्यास विश्वनाथ व प्रमोद या दोघांनी शिवीगाळ करीत लाथाबुक्याने व चापटाने मारहाण केली. त्यांना यापुढे गवत काढण्यास व पेरण्यास आल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी ही दिली. याप्रकरणी विश्वनाथ चौरे, प्रमोद चौरे, उषाबाई चौरे, अंजली चौरे या चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

# व्हिक्टरी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

## लहानग्यांच्या नेहरू रूपांनी कार्यक्रमाला उजाळा




बीड, (दिव्य न्युज):- व्हिक्टरी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साह, आनंद आणि सांस्कृतिक वेशभूषेच्या थाटात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी अनेक बालगोपालांनी नेहरूजींची वेशभूषा परिधान करून चाचा नेहरूवरील आपले प्रेम व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात चाचा नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका कुमारी विजयश्री मॅडम यांनी चाचा नेहरूंना मुलांविषयी असलेले अपार प्रेम सांगत बालदिनाचे महत्त्व स्पष्ट केले. आजची मुले उद्याचे नागरिक आहेत हे चाचा नेहरूंचे ब्रीदवाक्य त्यांनी मनावर ठसवले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सुंदर भाषणे सादर करून या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले. मुलांना गुलाबफुले ओवाळून व चॉकलेट वाटून बालदिन साजरा करण्यात आला. वातावरणात आनंद, निरागसता आणि चैतन्याचे विलक्षण असे दर्शन घडले.

या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन आरती नेमाने मॅडम यांनी केले, तर कार्यक्रमाची सांगता प्रज्वली मॅडम यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. तसेच कसबे मॅडम व दिपाली मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.कार्यक्रमात विद्यार्थिनी श्रद्धा कारगुडे, सौम्या गायकवाड आणि रिदा मिर्झा यांनीही भावपूर्ण भाषणे सादर केली.व्हिक्टरी इंग्लिश स्कूलचा हा बालदिन सोहळा शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीने संस्मरणीय ठरला.

पान ४ वरून

## कार्यकर्ते उमेदवारी

म्हणत स्पर्धा लावत आहेत. उमेदवारी मिळणार नाही हे लक्षात येताच कार्यकर्ता सोबत आलेल्या मित्रांना घेऊन परतत आहे. आपण दहा वर्षापासून स्वतःच्या भाकरी खाऊन आपल्या नेत्यासाठी झटलो. परंतु आपल्याला न्याय दिला नाही असे वाटून अनेक कार्यकर्ते नाराज होताना दिसून येत आहेत. त्यामुळे पक्षातीने नेत्यांना उमेदवारी देतांना स्वच्छ प्रतिमेचा, निष्ठावान, जनसंपर्क असलेला उमेदवार निवडावा लागणार आहे.

## राजकीय सस्पेन्स

भरू शकत नाहीत किंवा अर्ज भरला असला तरी माघार घेण्यासाठी त्यांना वेळ मिळणार नाही.

त्यामुळे, सर्वच पक्ष धोका उमेदवारांचे 'एबी फॉर्म' देणार असल्याचे समजते. पत्करण्याऐवजी शेवटच्या दिवशी आगामी तीन दिवस जिल्ह्यातील सहाही नगरपालिकांमध्ये राजकीय नाट्य शिगेला पोहोचणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्ह्यातील नगर पालिका कार्यालयांमध्ये गर्दी आणि राजकीय तणाव पाहण्यास मिळण्याची शक्यता आहे.

## परळीत काँग्रेस

लागलेला प्रश्न म्हणजे 'काँग्रेस,तुतारी समन्वयाचा पूल अखेर कोसळतोय का?' ही परिस्थिती फक्त दोन गटांतील वादापुरती मर्यादित नाही, ती परळीतील आगामी निवडणुकीच्या दिशा ठरवणाऱ्या महत्वाच्या संकेतांपैकी एक ठरते आहे.

आता प्रमुख प्रश्न पुढे उभे आहेत

१) काँग्रेस स्वतंत्र वाटचाल करणार का? २) तुतारी गटाची पुढील रणनीती काय असणार ३) महाविकास आघाडीमध्ये खरोखर तडा पडणार का?हे प्रश्न फक्त परळीपुरते मर्यादित नाहीत; ते जिल्ह्यातील संपूर्ण आघाडीच्या भवितव्याशी जोडलेले आहेत. परळी हे राजकीयदृष्ट्या संवेदनशील केंद्र. येथे उमटणारे राजकीय तरंग अनेकदा जिल्हास्तरावर बदल घडवतात. त्यामुळे ही परिस्थिती केवळ नाराजी किंवा राजकीय अधांतरी स्थिती म्हणून पाहणे ही चूक ठरेल. हे महाविकास आघाडीच्या अंतर्गत रचनात्मक आणि राजकीय स्वास्थ्याचे आरसे आहे. आगामी काही आठवड्यांत कोण संवाद साधतो, कोण पाऊल मागे घेतो आणि कोण स्वतंत्र मार्ग स्वीकारतो यावर परळी नगर परिषदेच्या निवडणुकीचे भविष्य ठरणार आहे. आणि त्याचबरोबर आघाडीची एकजूटही कसोटीवर उभी राहणार आहे. सध्या मात्र शहराच्या हवेत एकच चर्चा ठळकपणे घुमत आहे, तुतारीला खरोखरच काँग्रेस चिन्हाची ॲलर्जी झाली आहे का?

## उबाठा पक्षाकडून

कंबर कसून तयारी सुरू केली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष देखील जोरदार तयारीत आहे. बीडमध्ये शिवसेनेचा प्रभाव लक्षणीय असून, या पार्श्वभूमीवर संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी महत्त्वाची मानली जाते. पक्षाने कणखर आणि संघटन कौशल्य असलेल्या नेत्यांवर ही जबाबदारी दील्याने नक्कीच सर्व सामान्य कार्यकर्त्याला या निवडीने बळ मिळणार आहे पक्षाने दाखवलेल्या या विश्वासाबद्दल निष्ठावंत शिवसैनिकांतून समाधान व्यक्त केले जात असून, आगामी निवडणुकांमध्ये बीड विधानसभा क्षेत्रात पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी ते सक्रियपणे काम करतील व निष्ठा पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांना संधी देतील असे सांगितले आहे.

## वाढदिवसाचा खर्च

केला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू लोकांना मदत करणे हा एक चांगला आणि सामाजिक उपक्रम आहे. यामध्ये डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणामुळे सर्व बीड जिल्ह्यामध्ये व वडवणी तालुक्यामध्ये एक प्रकारची शोककळा पसरलेली होती, त्यामुळे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या कुठलाही कार्यक्रम न घेण्याचा निर्णय घेतला व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात येणारे सर्व उपक्रम सर्व कार्यक्रम रद्द करून डॉक्टर संपदा मुंडे यांच्या कुटुंबास आर्थिक मदत करण्याचा निर्णय संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ वडवणी तालुका व भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स वडवणी यांच्या वतीने घेण्यात आला त्यानिमित्ताने कवडगाव येथे सर्व मित्र परिवारांनी उपस्थित राहून ४१ हजार रुपयाची आर्थिक मदत मुंडे कुटुंबीयास करण्यात आली..... यावेळी उपस्थित होते- वडवणी नगरीचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती अनिल दादा छोले, भाजपा जिल्हा सरचिटणीस मच्छिंद्र बाप्पा झाटे, रंजित भैय्या धस संचालक मार्केट कमिटी वडवणी रूई चे आदर्श सरपंच मयूर भैया आंधळे, साळींबा गावचे युवा सरपंच दिनेश नाईकवांडे, भाजपा युवा मोर्चा चे युवा नेते धनराज मुंडे, चिंचाला चे सरपंच लक्ष्मण बापू मुंडे, चिंचवण चे युवा नेते देवानंदजी तांबडे, शिक्षक बंडू नागरगोजे, निवृत्ती अण्णा आंधळे, विष्णू आंधळे सर, धैतीडक सर, विठ्ठल मुंडे सर, आबासाहेब आंधळे सर, पत्रकार जानकीराम उजगरे, पत्रकार शरीफ भाई..... तसेच सर्व मित्र मंडळाचे सहकारी उपस्थित होते..

पान १ वरून

## पप्पू कागदेंच्या

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची जबाबदारी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे आली आहे. त्यांच्याकडून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या पत्नीला बीड नगराध्यक्षपदासाठी पुढं आणलं जातंय. तशा प्रकारचा त्यांचा निर्णय देखील झाल्याची माहिती मिळत आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी अद्यापही आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यांच्याकडे १६ जण इच्छूक आहेत. घड्याळ आणि कमळाचा उमेदवार कोण येतो, ते पाहून आ. क्षीरसागर निर्णय घेणार असल्याचं समजत आहे.

## आ.क्षीरसागरांकडून

यांनी सर्व कार्यकर्त्यांना जातीचे राजकारण केले जाणार नसल्याचे ठणकावून सांगितले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून बौद्ध समाजातील सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

नगराध्यक्ष पदासाठी दोन्ही राष्ट्रवादी सह भाजप आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या आघाडीमध्ये जोरदार लढत होणार असून विकासाच्या मुद्द्यावर होणार असल्याचे बोलले जात आहे.संदीप क्षीरसागर यांनी आमदार झाल्यापासून शहरात अनेक विकासाची कामे केली आहेत. या विकासकामुळे बीड शहराच्या वैभवात भर पडली आहे. त्यांच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी सचिन आप्पा सोनवणे यांचे नाव आघाडीवर असून सर्व समाजातून देखील त्यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी होत आहे.संदीप भैय्यांनी जर सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी दिली तर विजय पक्का अशी चर्चा बीड शहरात होताना पाहावयास मिळत आहे. सचिन सोनवणे हे देखील संदीप क्षीरसागर यांच्यासोबत एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहून काम करत आले आहेत. त्यांच्याकडे स्वच्छ प्रतिमेचा चेहरा आणि प्रामाणिक म्हणून पाहिले जाते. सर्व समाजात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. सर्व समाजात मिळून मिसळून राहणारे आणि सुखदुःखात धाऊन जाणारे सचिन आप्पा यांची ओळख आहे. त्यामुळे संदीप क्षीरसागर हे सचिन आप्पा सोनवणे यांनाच उमेदवारी देतील आणि बीड नगर पालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचा झेंडा फडकवतील यात तिळमात्र शंका नाही.

## डॉ.योगेश क्षीरसागरांनी

पातळीवर पक्षाचा निर्णय प्रक्रियेमध्ये मला जाणीवपुर्वक डावलले जात असल्यामुळे मी पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या कानावर ही बाब अनेक वेळा घातलेली आहे. परंतु यामध्ये कोणतेही बदल झालेला दिसला नाही. यामुळे मी माझ्या बीड विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे असे या राजीनामापत्रात म्हंटले असून आज दिवसभर दोन्ही गटाची दिलजमई होणार असल्याची शहरभर चर्चा होत होती. दुपारी २ वाजता पक्षाचे नेते धनंजय मुंडे हे बीडमध्ये येणार आहेत आणि दोन्ही गटाची समजूत काढून एक दिलाने काम करण्यासाठी दोघांना समज देणार असल्याचेही सांगितले जात होते. परंतु धनंजय मुंडे हे बीडमध्येआलेच नाही आणि आता डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने आता ही फुट अटळ झाली असून आता दोघांचेही रस्ते वेग वेगळे झाले आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पाऊल हळूहळू हे भाजपाच्या दिशेने जातांना दिसून येत आहे.

## गटातटाच्या राजकारणा

नेत्यांचा भर दिसून येत आहे.

बीड पालिकेची सत्ता मागील ४० वर्षापासून एकाच घराण्याभोवती फिरत असतांना येथील मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. मात्र निवडणूकीत या प्रश्नांना सहज बगल देत जाती-पातीचा, प्रतिष्ठेचा मुद्दा पुढे केला जात आहे. बीड शहरात मुस्लिम मतदार निर्णायक आहेत. आरक्षण अनुसुचीत जातीला सुटले असले तरी क्षीरसागर बंधू जो उमेदवार देतील तोच निर्णायक असेल. सध्या आमदार संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादीकडून चाचपणी सुरू आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विधानसभा प्रमुख राष्ट्रवादी की जनता विकास आघाडी करणार हे निश्चित नाही. तर दुसरीकडे एमआयएमची तयारी सुरू असून गेवराईचे पंडितही बीडमध्ये राष्ट्रवादीच्या माध्यमातून एंट्री मारत उमेदवार तयारीत आहेत.बीड नगर पालिकेच्या रणधुमाळीत नगराध्यक्षपदासाठी दोन प्रमुख प्रतिस्पर्धी उमेदवारांबद्दल नागरिकांमध्ये उत्सुकता असून येत्या दोन दिवसात चित्र स्पष्ट होणारआहे.

प्रचारादरम्यान धार्मिक मुद्देही गाजण्याची शक्यता

अनुसुचीत जातीला इतिहासात प्रथमच बीडचा नगराध्यक्ष होण्याचा मान मिळणार आहे. मात्र मताचा टक्का जुळून जर आंतरजातीय विवाह झालेल्या एखाद्याला उमेदवारी देऊन मैदानात उतरवले तर बीडमध्ये जातीपातीच्या मुद्यावर येऊन निवडणूक ठेपतील. काही पक्षाकडून तसा प्रयत्न सुरू आहे. बीड शहरातील १ लाख ८० हजार ६५८ मतदार नगराध्यक्ष निवडणार असून यामध्ये मुस्लिम मतदार निर्णायक ठरणार आहे.

मागील पक्षीय बलाबल

काकू-नाना आघाडी: १९ नगरसेवक एकसंघ राष्ट्रवादी १८ नगरसेवक, नगराध्यक्ष, एमआयएम १० नगरसेवक,शिवसेना: २ नगरसेवक भाजप १ नगरसेवक

## नगरपरिषद-

नामनिर्देशनपत्र भरण्याची सवलत देण्यात आली आहे. तसेच सुट्टीच्या दिवशीही दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येतील, असंही आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.दरम्यान, नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर २०२५ असून उमेदवारांना दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज सादर करता येणार आहे. अशातच आता ऑफलाईन पद्धतीनेही नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार असल्याने इच्छुक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.




बीड : बीड नगर परिषदेच्या प्रभाग क्रं. १८ (ब) मधून युवा समाजसेवक इम्रान जहाँगिरदार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केला. यावेळी इम्रान जहाँगिरदार यांच्या अनेक समर्थकांची आणि मतदारांची उपस्थिती होती.